**सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.**
**श्री. कैलास बाळकृष्ण सोनार, लेखा अधिकारी.**

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
01 JUN 2026
प्राप्त झाले सही..........................

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२६/प्र.क्र.६५/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-२९.०५.२०२६.

**संदर्भ:-**

१. नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र क्र. जा. क्र. नादेकृसंप्र-०४२४ / प्र.क्र.३९ / मृवि / ११०६, दिनांक ३१.१२.२०२४.
२. उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, जळगाव यांचे पत्र जा.क्र. / उविकृअ / आस्था / कार्य / श्री.सोनार / ८३६ / २०२४, दिनांक ३१.१२.२०२४.
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक यांचे आदेश क्र.सहसं/०४.२०२१/प्रशा-१/न.क्र.२१०/००५/५, दिनांक ०१.०१.२०२५.
४. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.२००/कोषा.प्रशा-२, दिनांक १५.०१.२०२५.
५. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव यांचे आदेश जा.क्र.कोष/कावि/आस्था-१/कार्यमुक्त/श्री.कै.बा.सोनार/०१-२०२५/१७२, दिनांक १५.०१.२०२५.
६. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे १००१/१३०/सेवा-४, दिनांक ०२.०६.२००३.
७. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१.
८. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६.
९. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको / प्रशा-राप / का.६ / स.प्र.का / ०१.२०२६ / १४६ / १२३ / ५५५, दिनांक ३०.०६.२०२६.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. कैलास बाळकृष्ण सोनार, लेखा अधिकारी, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, व्यवस्थापन कक्ष, जळगांव येथे कार्यरत असताना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या क्षेत्रिय स्तरावरील लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा दिनांक ३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी संपुष्टात येत असल्याने उपविभागीय कृषि अधिकारी, जळगाव यांचे संदर्भाधिन दिनांक ३१.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री. सोनार यांना दिनांक ३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक यांचे संदर्भाधिन दिनांक ०१.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. सोनार यांना पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक या कार्यालयात दिनांक ०१.०१.२०२५ (म.पू.) रोजीपासून रुजू करुन घेण्यात आले व श्री. सोनार यांना तात्पूरत्या स्वरुपात अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला.

00904/2026/1268
03-06-26

३) वित्त विभाग, शासन आदेश दिनांक १५.०१.२०२५ अन्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेले श्री. सोनार यांना अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव या पदावरच नियमित पदस्थापना देण्यात आली.

४) श्री. सोनार यांना नियमित पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव यांचे दिनांक १५.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिनांक १५.०१.२०२५ (म.नं.) रोजी त्यांना कार्यमुक्त करण्यात आले. त्यानुसार, श्री. सोनार हे पदस्थापनेच्या पदावर दिनांक १५.०१.२०२५ (म.नं.) रोजी रुजू झाले आहेत.

५) श्री. सोनार यांना उप विभागीय कृषी अधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडून दिनांक ३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त केल्यानंतर दिनांक ०१.०१.२०२५ ते दिनांक १५.०१.२०२५ पर्यंत एकूण १५ दिवस पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करावयाचा आहे. नियमित करावयाचा कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दिनांक ०१.०१.२०२५ | ०१ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक कार्यालयात रुजू. |
| दि.०२.०१.२०२५ ते दि.१५.०१.२०२५ | १४ | जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव कार्यालयात पदस्थापनेच्या प्रतिक्षेत कार्यरत. |
| **एकूण** | **१५** | |

६) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) तसेच, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६ मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. कैलास बाळकृष्ण सोनार, अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव यांचा दिनांक ०१.०१.२०२५ ते दिनांक १५.०१.२०२५ रोजीपर्यंतच्या एकूण १५ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगाव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ. भसारकर
२८.०५.२०२५.

**(अ. अ. भसारकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*
४) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*
५) कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगांव *
६) श्री. कैलास बाळकृष्ण सोनार, लेखा अधिकारी*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)